Dnyanvardhini Trust's
# Sonubhau Baswant College of Arts & Commerce
Naginbhai Vasa Marg, Savroli Road, SHAHAPUR, Dist. Thane. 421 601 ☎ 02527 - 270166
(Affiliated to the University of Mumbai)
* ISO 9001:2015 Certified * * Re-Accredited With 'B' Grade by NAAC *
E-mail : sbcollege123@yahoo.com www.sbcollegeshahapur.com Fax No. 02527 - 273914

Ref. No. .................................................. Date : 28/11/2020

# सूचना

## शिष्यवृत्ती व फ्रिशीप उत्पन्न मयदिसंबंधी सूचना
## सन २०२० - २०२१

| क. | वर्ग | शिष्यवृत्ती उत्पन्न मर्यादा | फ्रिशिप उत्पन्न मर्यादा |
|---|---|---|---|
| १ | अनुसूचित जाती (S.C.) | रू. २,५०,०००/- | रू. २,५०,०००/- ते अमर्यादीत |
| २ | भटक्या जमाती (N.T.) | रू. १,००,०००/- | रू. १,००,०००/- ते ८,००,०००/- (सन २०२०-२०२१ चे नॉन क्रिमिलेअरचा दाखला आवश्यक) |
| ३ | इतर मागासवर्ग (O.B.C.) | रू. १,००,०००/- | रू. १,००,०००/- ते ८,००,०००/- (सन २०२०-२०२१ चे नॉन क्रिमिलेअरचा दाखला आवश्यक) |
| ४ | विषेश मागास वर्ग (S.B.C.) | रू. १,००,०००/- | रू. १,००,०००/- ते ८,००,०००/- (सन २०२०-२०२१ चे नॉन क्रिमिलेअरचा दाखला आवश्यक) |
| ५ | अनुसूचित जमाती (S.T.) | रू. २,५०,०००/- | रू. २,५०,०००/- ते अमर्यादीत |

PRINCIPAL
nubhau Baswant College
of Arts and Commerce
Shahapur,Dist Thane

Scanned with CamScanner

Dnyanvardhini Trust's

# Sonubhau Baswant College of Arts & Commerce, Shahapur

## सूचना

दि. २८/११/२०२०

## खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांसाठी

( सन २०२० - २०२१ )

सन २०२० - २०२१ या वर्षात सर्व खुल्या प्रवर्गातील अनुदानित व विनाअनुदानित विद्यार्थ्यांसाठी **राजश्री छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृत्ती योजना व डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निवार्हभत्ता योजना** महाराष्ट्र शासनाने सुरू केलेली आहे. तरी सदर योजनेचा लाभ घेणा-या विद्यार्थ्यांनी खालील नमुद केलेल्या वेबसाईट वर आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने भरावेत.

**अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी वेबसाइट पुढील प्रमाणे -**
https://mahadbt.mahait.gov.in

सदरहू वेबसाईट दि. ०३/१२/२०२० पासून चालू होत असून, विद्यार्थ्यांनी आपले अर्ज यशस्वीरीत्या अपलोड करून अर्जाची प्रिंट काढून आपल्याजवळ ठेवावी. महाविद्यालयाकडून जेव्हा सूचना येईल तेव्हाच सदरहू अर्ज महाविद्यालयात जमा करावे, तसेच आपल्या लॉगीनवर आपल्या अर्जाचे अपडेट पहावे. जे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणार नाहीत, त्यांना सदर योजनेचा लाभ मिळणार नाही व सर्व जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांवरती राहील, याची नोंद घ्यावी.
**अर्जासोबत विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रती जोडाव्यात.**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.
२. वडीलांचा उत्पन्नांचा दाखला - सन २०२०-२०२१ ( दाखल्याची वैधता मार्च २०२१ असावी ) ( उत्पन्न मर्यादा रू. आठ लाखापर्यंत )
३. सर्व विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्डक्रमांकाची झेरॉक्स प्रत जोडावी व आधारकार्ड ज्या बँकेत खाते उघडलेले आहे, त्या खात्याशी संलग्न करून घ्यावे. आधारकार्ड क्रमांक बँक खात्याशी संलग्न न केल्यास शिष्यवृत्ती खात्यावर जमा होणार नाही, याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.
४. रेशनकार्ड झेरॉक्स
५. नॉन क्रिमिलियर दाखला सन २०२०-२०२१ चा जोडावा.
६. (Domocile Certificate ) वास्तवाचा दाखला (तहसील कार्यालयातून )
७. परिक्षा फी भरल्याची पावती
८. सदर योजनेचा लाभ फक्त दोनच अपत्यांना मिळणार आहे.

जे विद्यार्थी ऑनलाईनद्वारे शिष्यवृत्तीचे अर्ज भरणार नाहीत, त्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती लाभ मिळणार नाही व त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपुर्ण वर्षाची फी भरावी लागेल, तसेच सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांची महाविद्यालयात कमीत-कमी ७५ टक्के उपस्थिती असली पाहिजे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती दिली जाणार नाही व परीक्षेस बसू दिले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

S.B. COLLEGE OF ARTS AND COMMERCE SHAHAPUR

प्राचार्य
सोनुभाऊ बसवंत कला वाणिज्य विद्यालय
ता. शहापूर, जि. ठाणे.

Scanned with CamScanner

Dnyanvardhini Trust's

Sonubhau Baswant College of Arts & Commerce, Shahapur

२८-११-२०२०

**F.Y.B.A./B.Com./ Banking & Ins. / A/c & Finance / B.Sc.IT**
**S.Y.B.A./B.Com./ Banking & Ins. / A/c & Finance / B.Sc.IT**
**T.Y.B.A. / B.Com. / Banking & Ins. / A/c & Finance / B.Sc.IT**
**M.A. PART I / II**

# शिष्यवृत्ती व फ्रिशीप संदर्भात सूचना

## ( सन २०२० - २०२१ )

महाराष्ट्र शासनाने राज्यातील सर्व शिष्यवृत्ती व फ्रिशीप धारक विद्यार्थ्यांचे शिष्यवृत्ती अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरण्याचे आहेत. आपल्या महाविद्यालयातील F.Y.B.A./B.Com./ Banking & Ins. / A/c & Finance, S.Y.B.A./B.Com./ Banking & Ins. / A/c & Finance, T.Y.B.A. / B.Com. ./ Banking & Ins. / A/c & Finance , M.A. PART I / II च्या अनुसूचित जाती (S.C.), भटक्या जाती (D.T. / N.T.), विषेश मागासवर्गीय (S.B.C.), इतर मागासवर्गीय (O.B.C.), तसेच F.Y./ S.Y./ T.Y. B.Sc.IT च्या अनुसूचित जाती (S.C.) व अनुसूचित जमाती (S.T.) शिष्यवृत्ती व फ्रिशिपधारक विद्यार्थ्यांनी आपले अर्ज ऑनलाईन पद्धतीने भरावेत.

**शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे अर्ज ऑनलाईन भरण्यासाठी वेबसाईट पुढील प्रमाणे -**

(O.B.C./S.B.C/D.T./N.T/S.C./S.T.) = http:mahadbtmahit.gov.in

सदरहू वेबसाईट दि. ०३/१२/२०२० पासून चालू होत असून, विद्यार्थ्यांनी आपले अर्ज यशस्वीरीत्या अपलोड करून अर्जाची प्रिंट काढून आपल्याजवळ ठेवावी. महाविद्यालयाकडून जेव्हा सूचना येईल तेव्हाच सदरहू अर्ज महाविद्यालयात जमा करावे, तसेच आपल्या लॉगीनवर आपल्या अर्जाचे अपडेट पहावे. जे विद्यार्थी ऑनलाईन पद्धतीने अर्ज भरणार नाहीत, त्यांची शिष्यवृत्ती / फ्रिशीप मिळणार नाही व सर्व जबाबदारी संबंधीत विद्यार्थ्यांवरती राहील, याची नोंद घ्यावी.

**शिष्यवृत्ती व फ्रिशीप अर्जासोबत विद्यार्थ्यांनी खालील कागदपत्रांची साक्षांकीत झेरॉक्स प्रती जोडाव्यात.**

१. मागील वर्षाची गुणपत्रिका.
२. विद्यार्थ्याचा जातीचा दाखला व (जातीचा वैधता प्रमाणपत्र - B.Sc.IT)
३. शिक्षणामध्ये खंड असल्यास गॅप सर्टिफिकेट. (दहावी ते आजपर्यंत )
४. वडील / आई ह्यात नसल्यास मृत्यूचा दाखला.
५. विद्यार्थ्याचा शाळा सोडल्याचा दाखला.
६. वडीलांचा उत्पन्नांचा दाखला - सन २०२०-२०२१. ( दाखल्याची वैधता मार्च २०२१ असावी. )
७. सर्व विद्यार्थ्यांनी आपले आधार कार्डची झेरॉक्स प्रत जोडावी व आधारकार्ड ज्या बँकेत खाते उघडलेले आहे, त्या खात्याशी संलग्न करून घ्यावे.
८. रेशनकार्डची झेरॉक्स
९. तिस-या अपत्यास शिष्यवृत्ती व फ्रिशीपचा लाभ मिळणार नाही. ( S.C./S.T विद्यार्थी आणि मुलींना वगळून )
१०. (O.B.C./D.T./ N.T./S.B.C.) नॉन क्रिमिलेअरचा दाखला आवश्यक
११. वडील मजुरी, धंदा, शेती, सरकारी नोकरी करीत असल्यास तहसिलदारांनी दिलेला उत्पन्नाचा दाखला जोडावा.
१२. प्रथम / द्वितीय / तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांनी पासबुकाच्या खाते क्रमांकाची झेरॉक्स प्रत अर्जासोबत जोडावी.
१३. वास्तवाचा दाखला (Domocile Certificate ) तहसील कार्यालयाचा
१४. जे विद्यार्थी शासकीय वसतीगृहात राहात असतील त्यांनी वसतीगृहाचा दाखला जोडणे आवश्यक आहे.

जे विद्यार्थी ऑनलाईनद्वारे शिष्यवृत्ती व फ्रिशीपचे अर्ज भरणार नाहीत, त्या सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रिशीपचा लाभ मिळणार नाही व त्या विद्यार्थ्यांना महाविद्यालयाची संपुर्ण वर्षाची फी भरावी लागेल, तसेच सर्व शिष्यवृत्ती / फ्रिशीपधारक विद्यार्थ्यांची महाविद्यालयात कमीत-कमी ७५ टक्के उपस्थिती असली पाहिजे. अन्यथा अशा विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती व फ्रिशीप दिली जाणार नाही व परीक्षेस बसू दिले जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

S.B. COLLEGE OF ARTS AND COMMERCE SHAHAPUR 1984

प्राचार्य
सोनुभाऊ बसवंत कला वाणिज्य महाविद्यालय
ता. शहापूर, जि. ठाणे.

Scanned with CamScanner